**RNI No. MAHBIL /2009/35530**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक ७] मंगळवार, एप्रिल १५, २०२५/चैत्र २५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.**—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | **पृष्ठे** **१-३** |

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२,
दिनांक १५ एप्रिल २०२५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. I OF 2025.**

*AN ORDINANCE*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; १९६५ चा महा. ४०.

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-५ ऐवजी दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ याच्या कलम ३४१ब-५ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

पंचायत सदस्यांनी नगरपंचायतीच्या अध्यक्षाला काढून टाकणे.

"**३४१ब-५.** (१) कलम ३४१ब-१ अन्वये निवडून आलेला नगर पंचायतीचा अध्यक्ष, जर एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांच्या बहुमताने, विशेष सभेमध्ये संमत केलेल्या ठरावाद्वारे, तसा निर्णय केला असेल तर, अध्यक्ष असण्याचे समाप्त होईलः

परंतु, अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत, असा कोणताही ठराव मांडण्यात येणार नाही.

(२) अशा विशेष सभेच्या मागणीपत्रावर, एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांकडून सही करण्यात येईल आणि ते, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) खालील मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, नगर पंचायतीची विशेष सभा बोलावीलः

परंतु, जेव्हा जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावील तेव्हा, तो, त्याची सूचना अध्यक्षास देईल.

(४) पोट-कलम (१) खालील ठरावावर विचार करावयाच्या सभेच्या अध्यक्षस्थानी, जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी असेल, परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अन्य अधिकाऱ्यास, मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(५) नामनिर्देशित पंचायत सदस्यांना, अध्यक्षास काढून टाकण्याशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(६) जर पोट-कलम (३) खालील प्रयोजनासाठी बोलाविलेल्या विशेष सभेमध्ये, अध्यक्षास काढून टाकण्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला नसेल, किंवा यथास्थिति, तो फेटाळण्यात आला असेल तर, अध्यक्षास काढून टाकण्याची मागणी करणारा कोणताही नवीन ठराव, नगरपंचायतीसमोर मांडण्यात येणार नाही.".

# निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ३४१ब-१ च्या तरतुदींनुसार, ज्या नगर पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२२ (२०२२ चा महा. ४१) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी घेण्यात आली आहे अशा प्रत्येक नगरपंचायतीचा अध्यक्ष हा, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला अध्यक्ष आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ब-५ अन्वये नगरपंचायतीच्या अध्यक्षास काढून टाकण्याच्या प्रक्रियेमध्ये, एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांनी सही केलेले, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवावयाचे, अध्यक्षाविरुद्धच्या गैरवर्तणुकीच्या आरोपांचा अंतर्भाव असणारे मागणीपत्र, जिल्हाधिकाऱ्याने करावयाची चौकशी, शासनास सादर करावयाचे अशा चौकशीचे निष्कर्ष, जिल्हाधिकाऱ्याचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर शासनाने घ्यावयाचा अंतिम निर्णय यांचा समावेश आहे.

निवडून आलेल्या पंचायत सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला अध्यक्ष हा, जर एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांच्या बहुमताने, विशेष सभेमध्ये संमत केलेल्या ठरावाद्वारे, तसा निर्णय केला असेल तर, अध्यक्ष असण्याचे समाप्त होईल अशी तरतूद करणे इष्ट आहे असे वाटते. म्हणून, विशेष सभेमध्ये संमत केलेल्या ठरावाद्वारे, पंचायत सदस्यांनी अशा अध्यक्षास काढून टाकण्यासाठी आणि त्यासाठीच्या प्रक्रियेकरिता तरतूद करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ब-५ ऐवजी, नवीन कलम दाखल करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **सी. पी. राधाकृष्णन,**

दिनांक १५ एप्रिल २०२५. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. के. एच. गोविंद राज,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.